# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.०६/०६/२०२४

**<u>प्रेसनोट</u>**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात **"अतिसार नियंत्रण पंधरवडा" दि.०६ जून २०२४ ते २१ जून २०२४** या कालावधीत राबविण्यात येत आहे. या पंधरवडा कालावधीत महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागातर्फे ए.एन.एम व आशा कर्मचारी यांचेमार्फत घरोघरी सर्वेक्षण करण्यात येणार असून अतिसार असलेले बालक आढळल्यास त्याच्या उपचाराकरिता ओ.आर.एस. व झिंक याचे वाटप करण्यात येणार आहे. अतिसारामुळे होणारे बालमृत्यू शून्यावर पोहोचविणे हे या मोहिमेचे अंतिम ध्येय आहे.

❖ **<u>अतिसाराची लक्षणे :</u>**

१) बाळ सुस्तावलेले असणे किंवा बेशुद्ध पडणे.
२) डोळे खोल जाणे.
३) स्तनपान करू शकत नाही किंवा असमाधानकारकरित्या दुध पित असणे.
४) बाळाच्या त्वचेचा चिमटा घेतला असता त्वचा हळूहळू पूर्वरत होणे.
५) अस्वस्थपणा / चिडचिडेपणा
६) शौचामध्ये रक्त पडणे
७) कमी पाणी पित असणे
८) ताप येत असणे

❖ **<u>अतिसारावरील उपचार :</u>**

१) अतिसार झाल्याबरोबर (एका दिवसामध्ये तीन पेक्षा जास्त वेळा जुलाब होणे) लगेच ओ.आर.एस. (ORS) चे द्रावण आणि इतर द्रव्य पदार्थ देणे आणि अतिसार थांबेपर्यंत देत राहणे.
२) अतिसार असलेल्या बालकाला १४ दिवसापर्यंत झिंक गोळी देणे. अतिसार होणे थांबले तरी गोळी देत राहणे.
३) अतिसारामध्ये ओ.आर.एस. (ORS) व झिंक देणे हे अतिसारावरील उपचाराची योग्य पद्धती असून अतिसार लवकर बरा होण्यास फायदेशीर आहे.
४) अतिसार दरम्यान जे बाळ स्तनपान घेत असेल त्याला स्तनपान सुरु ठेवा आणि अतिसारा दरम्यान व नंतरही जास्तीत जास्त स्तनपान देतच राहा.
५) स्वच्छ हातांनी स्वच्छ निर्जंतुक पाणी पिणे.
६) स्वयंपाक करण्यापूर्वी, बालकाला जेवण भरवण्यापूर्वी तसेच बालकाची शी स्वच्छ केल्यानंतर आणि बालकाला साफ केल्यानंतर मातेने हात साबणाने स्वच्छ धुवून घेणे.

अतिसाराबाबतच्या सल्ल्यासाठी नजीकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात किंवा ए.एन.एम व आशा यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत करण्यात येत आहे.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**